महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

================================================================

जा.क्र.तशिविकापू/विवि/ मराठीभाषा/२०२०/ 3111 दिनांक :- 1/10/2020

परिपत्रक :-

प्रति,
संचालक/प्राचार्य
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्था

विषय :- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये सुधारण करण्याच्या अनुषंगाने अभिप्राय कळविण्याबाबत.
संदर्भ:- १. मा.संचालक यांचे पत्र क्र १६/आस्था/संकीर्ण/२०२०/१६३ दिनांक २८/०९/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरुन मराठी भाषा विभाग यांचे पत्र क्रमांक मभावा-२०२०/प्र.क्र.७१/भाषा-२ दिनांक १६/०९/२०२० सोबत जोडत आहे.

महारष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार राजभाषा म्हणून मराठी भाषेचा स्वीकार करण्यात आला. त्यांनतर दीर्घ कालावधी लोटूनही आजपर्यत सदर अधिनियमात सुधारण करण्यात आलेली नाही. मराठी भाषा कार्यालयीन कामकाजात आणि समाजात जास्तीत जास्त वापरण्यात यावी या दृष्टीने सदर अधिनियमाची फेररचना करणे आवश्यक बाब बनली आहे. सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या तपासणी सुचीतील मुद्दयांसंदर्भातले आपल्या संस्थेचे मराठी भाषेच्या वापराबाबतचे आपले अभिप्राय त्वरीत या विभागीय कार्यालयास कळविण्यात यावे. जेणे करुन सदर माहिती वरिष्ठ कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

सदर माहिती या कार्यालयाच्या ईमेल आयडी info.ropune@gmail.com पाठविण्यात यावी माहिती पाठविताना प्रथम संस्थेचा संस्था कोड नमूद करावा नंतर विषयामध्ये **महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये सुधारण करण्याच्या अनुषंगाने अभिप्राय कळविण्याबाबत असे** नमूद करुन माहिती पाठविण्यात यावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597436,
ई-मेल–desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

ईमेलव्दारे

पत्र क्रमांक : 16/आस्था/संकीर्ण/2020/९६३
दिनांक : 28 SEP 2020

प्रति,
1) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

2) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : "महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964" मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने अभिप्राय कळविण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबतचे मराठी भाषा विभाग यांचे पत्र क्रमांक मभावा-2020/प्र.क्र.71/भाषा-2, दिनांक 16.9.2020 सोबत जोडत आहे.

सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, "महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964" मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. तरी, आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांमधील कामकाजाच्या अनुषंगाने आपल्या विभागाचे मराठी भाषेच्या वापराबाबतचे तपासणीसूचीतील मुद्दयांसंदर्भात विस्तृत अभिप्राय तपासणीसूची सोबत स्वतंत्रपणे दोन दिवसात या संचालनालयास पाठवावे, जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक 2, 2अ, 4, 4अ, 11 व 12, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर प्रकरणी आपल्या कार्यासनाचे अभिप्राय दोन दिवसांमध्ये या कार्यासनास पाठवावे.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
नवीन प्रशासकीय भवन ८ ,वा मजला,
मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय ,मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र : ०२२-२२७९ ४१ ७०
e-mail ID : rajashri.bapat@nic.in

क्रमांक : मभावा-२०२०/प्र.क्र.७१/भाषा-२

दिनांक : १६.०९.२०२०

कालमर्यादा

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय : "महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४" मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने अभिप्राय कळविण्याबाबत.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार राजभाषा म्हणून मराठी भाषेचा स्वीकार करण्यात आला. त्यानंतर दीर्घ कालावधी लोटूनही आजपावेतो सदर अधिनियमात सुधारणा करण्यात आलेली नाही. मराठी भाषा कार्यालयीन कामकाजात आणि समाजात जास्तीत जास्त वापरण्यात यावी या दृष्टीने सदर अधिनियमाची फेररचना करणे आवश्यक बाब बनली आहे.

त्यामुळे "महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४" मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या तपासणी सूचीतील मुद्दयांसंदर्भातले आपल्या विभागातील तसेच अधिनस्त असलेल्या आस्थापनांमधील व महामंडळांमधील मराठी भाषेच्या वापराबाबतचे आपले अभिप्राय कृपया १० दिवसांत कळवावे. जेणेकरुन, या अभिप्रायाचा सुधारित अधिनियमात समावेश करता येईल व कायद्यात परिणामकारक बदल समाविष्ट करता येतील. म्हणून आपले अभिप्राय लवकरात लवकर कळवावे, ही विनंती.

(हर्षवर्धन तु. जाधव)
प्र. उप सचिव, महाराष्ट्र शासन

D:\...\राजभाषा अधिनियम १७.९.२०.docx १९

तपासणी सूची:-

मराठी भाषेच्या वापराबाबत खालील मुद्द्यांसंदर्भात आपल्या विभागातील तसेच विभागाच्या अधिनस्त आस्थापनांमधील व महामंडळाच्या कामकाजासंदर्भातील माहिती द्यावी.

| अ.क्र. | मुद्दे | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विभागातील तसेच अधिनस्त आस्थापनांमधील व महामंडळातील कार्यालयीन धारीका, संचालक मंडळांच्या बैठकांच्या सूचना, इतिवृत्त इत्यादी कामकाज मराठी भाषेतून केले जाते का? | होय/नाही |
| २ | विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासन अनुदानित संस्थांचा अंतर्गत/प्रशासकीय कारभार मराठी भाषेत होतो का? | होय/नाही |
| ३ | विभागाच्या अधिनस्त अर्धन्यायिक प्राधिकरणांच्या निवाड्याचे निर्णय मराठी भाषेतून दिले जातात का? | होय/नाही |
| ४ | मंत्रालयीन विभाग, अधिनस्त कार्यालये, महामंडळे, विद्यापीठे किंवा अधिनस्त असलेल्या अन्य स्वायत्त आस्थापना यांची संकेतस्थळे मराठी भाषेत आहेत का? | होय/नाही |
| ५ | कार्यालयीन पत्रव्यवहार व नोंदवह्यांमध्ये वापरले जाणारे रबरी शिक्के व मुद्रा, कार्यालयातील हजेरीपट व समयोत्तर हजेरीपट मराठीत आहेत काय तसेच त्यावरील शेरे, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या मराठीतूनच आहेत का? | होय/नाही |
| ६ | सर्वसामान्य जनतेला दिली जाणारी माहितीपत्रके, विविध पावत्या, आवेदनपत्रे इ. बाबी तसेच कार्यालयाद्वारे प्रसिध्द होणारी/छापली जाणारी निवेदने, जाहिराती, अहवाल, माहिती किंवा सूचना, विहित नमुने इ. गोष्टी मराठी भाषेत उपलब्ध आहेत का? | होय/नाही |
| ७ | शाळा, महाविद्यालये तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम यांचे प्रवेश अर्ज व माहिती पत्रके मराठी भाषेत उपलब्ध आहेत का? | होय/नाही |
| ८ | ई-टेंडर बाबतची कार्यवाही मराठी भाषेतून केली जाते का? | होय/नाही |
| ९ | विभागाद्वारे करण्यात आलेल्या विविध नियमांमध्ये मराठी भाषा वापराचा उल्लेख आहे का? | होय/नाही |

** उपरोक्त तपासणीसूचीतील मुद्दयांसंदर्भात विस्तृत अभिप्राय तपासणीसूची सोबत स्वतंत्रपणे देण्यात यावेत.